# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईसह पुणे व नागपूर येथे मोठया प्रमाणात अवैध गावठी दारुची विक्री होत असल्याबाबत

**(१) ३०३८६ (२१-०१-२०१६). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह पुणे व नागपूर येथे मोठ्या प्रमाणात पोलीस व स्थानिक प्रशासनाला अवैध गावठी दारुची विक्री होत असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे होणाऱ्या अवैध गावठी दारुविक्रीला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) जानेवारी २०१५ ते जुलै, २०१५ या कालावधीमध्ये पोलीस घटकनिहाय पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

**बृहन्मुंबई :-** बृहन्मुंबई शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत सदर कालावधीत अवैध गावठी दारुची विक्री करणाऱ्यांविरुध्द १७३ केसेस करण्यात आल्या असून त्यामध्ये एकूण २०२ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

**पुणे शहर व ग्रामीण :-** पुणे शळर व ग्रामीण पोलीस ठाण्याअंतर्गत सदर कालावधीत अवैध गावठी दारुची भट्टी लावणे जवळ बाळगणे, वाहतूक करणेसंबंधात १,१३२ गुन्हे दाखल असून त्यात १,१८६ आरोपींना अटक करण्यात आली आहे व त्याकडून रु. १९,२१,२०६/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नागपूर व शहर ग्रामीण :-** नागपूर शहर व ग्रामीण पोलीस ठाण्याअंतर्गत सदर कालावधीत गावठी मोहा दारुची विक्री करणारे, बाळगणारे विरुध्द एकूण ९४८ गुन्हे दाखल असून त्यामध्ये १००० आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून रु. ३०,२९,५१७/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) अवैध गावठी दारु विक्रीला पायबंद घालण्याकरीता अवैध दारु धद्यांवर पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी एकत्रित कार्यवाही करणेबाबत या कार्यालयाच्या क्र.पोमसं/२३/५४/ विषारी दारुकांड बैठक/१०४१-२०१५ दिनांक १४/०९/२०१५ च्या परिपत्राकान्वये राज्यातील सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षकांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग, मुंबई यांनी सुध्दा त्यांचे क्र.डिईटी-११३२०१५ / मालवणी दुर्घटना / नऊ दि. २२.०९.२०१५ अन्वये त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय आयुक्त आणि अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना स्वतंत्र सूचना दिल्या आहेत.

तसेच, शासन परिपत्रक क्र. सीआरएम२०१७/प्र.क. ७१/पोल-१३ दि. १.३.२०१७ अन्वये अवैध दारु धंद्या संदर्भात करावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाहीबाबत सर्व पोलीस घटक प्रमुख व अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नालासोपारा ते निर्मळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ (ता.वसई, जि.पालघर) या रस्त्याच्या रुंदीकरण व गटार बांधण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२) ३९६७२ (०२-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ नालासोपारा ते निर्मळ या रस्त्याच्या रुंदीकरण व गटार बांधणीच्या सुरु असलेल्या कामात प्रचंड मोठ्या प्रमाणात झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिनांक ११ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निवेदनाच्या अनुषंगाने या कामाची उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणकोणत्या व्यक्ती दोषी आढळून आल्या व त्यांच्यावर कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रादेश विकास प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८ नालासोपारा ते निर्मळ या रस्त्याच्या रुंदीकरण व गटार व त्यावरील पेव्हरब्लॉकसह करण्यात आले आहे. तद्‌नंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत गटाराशेजारी नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात आले आहे. हे काम करतांना पदपथ अंशत: क्षतीग्रस्त झाला असून सदरचा पदपथ पुनश्च सुस्थितीत करण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिकेस मुंबई

महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कामाच्या गुणवत्तेबाबत सल्लागारामार्फत प्राप्त अवालानुसार सदर रस्त्याचे काम विहित गुणवत्तेनुसार झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर कामामध्ये कोणतीही अनियमितता नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील आरक्षित जमिनीवर सन २००० पर्यतची झालेली बांधकामे नियमित करणेबाबत**

**(३) ४२७७० (०७-०५-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील आरक्षित जमिनीवर सन २००० पर्यतची झालेली बांधकामे नियमित करणेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगमनेर (जि.अहमदनगर) येथील नगरपरिषद हद्दीतील जमिनीवर झालेली बांधकामे नियमित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१७) :**(१), (२) व (३) नागरी क्षेत्रातील दि.०१/०१/२००१ पुर्वी झालेली गुंठेवारी नियमित करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ पारित केलेला आहे. त्यामधील तरतुदीनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांना सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादनाखालील असलेल्या भूखंडातील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेस पात्र नाही.

सद्यस्थितीत दि.३१/१२/२०१५ पर्यंतच्या नागरी भागातील बेकायदा बांधकामांना संरक्षण देण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये योग्य ते बदल करण्यासाठी महाराष्ट्र ॲक्ट क्र.XXXII OF २०१७ पारित केलेला असून तो दि.१५/०४/२०१७ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. या अधिनियमातील कलम ५२ अे (१) नुसार याबाबतचे नियम तयार करणेत आलेले असून सदर प्रारुप नियम उक्त अधिनियमाच्या कलम-१५८(१) अन्वये दि.२१/०७/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्दी करण्यात येऊन याबाबत नागरीकांकडून सूचना / हरकती मागविण्यात आलेल्या आहेत.

---

**औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातून विविध प्रकारचे प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी असलेले सेतू सुविधा केंद्र बंद असल्याबाबत**

**(४) ५७३१२ (१९-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातून विविध प्रकारचे प्रमाणपत्रे मिळवण्यासाठी असलेले सेतू सुविधा केंद्र गेल्या ९ महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शैक्षणिक वर्षातील १० वी, १२ वीचा निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे तात्काळ विद्यार्थ्यांना मिळावीत यासाठी शासनाने कोणती पर्यायी उपाययोजना केली आहे,
(३) तसेच बंद असलेले सेतू केंद्र सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०७-२०१७) :**(१) व (२) औरंगाबाद जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्र चालविण्याचा करार संपल्यानंतर जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाने तत्कालीन निविदा धारकाकडून सदरची सेतू सुविधा केंद्रे ताब्यात घेतली. ती राज्य शासन नियुक्त एजन्सी सी.एम.एस कॉम्प्यूटर्स प्रा.लि.यांच्याव्दारे नियुक्त महा-ई-सेवा केंद्र VLE यांना चालविण्यास देवून पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रे बंद झाली नसून १० वी व १२ वी चा निकाल लागल्यानंतर या शैक्षणिक वर्षात ऑक्टोंबर २०१६ अखेर पर्यंत विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली सुमारे ६,११,१८५ इतकी प्रमाणपत्रे महा-ई-सेवा केंद्रांमार्फत वितरीत करण्यात आली आहेत.
(३) व (४) निविदाधारकांसोबतचा सेतू सुविधा केंद्र चालविण्याचा करार संपल्यावर औरंगाबाद जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्र चालविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवून ई-निविदा प्रक्रीया केली होती. एकूण चार निविदा धारकांनी सदर ई निविदा प्रक्रियेत भाग घेतला होता. त्यानुसार, मे.जे.एम.के.इन्फोसॉफ्ट सोल्युशन लि. यांची दि.२३/०६/२०१७ ते २२/०६/२०२० या कालावधीसाठी औरंगाबाद जिल्हा मुख्यालय १ व ८ तालुका मुख्यालयांकरीता सेतू सुविधा केंद्र चालविण्याकरीता निविदा धारक म्हणून निवड करण्यात आली असून जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी सदर कंपनीस दि.२३/०६/२०१७ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथे वाहतूक पोलिसाने मारहाण केल्यामुळे रिक्षा चालकाचा मृत्यू झाल्याबाबत

**(५) ६६३०६ (११-०१-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि. ठाणे) येथे दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ रोजी वाहतूक पोलिसाने मारहाण केल्यामुळे एका रिक्षा चालकाचा मृत्य झाला असून या प्रकरणी मृतकाच्या पत्नीने तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

दिनांक १२.९.२०१६ रोजी वाहतूक पोलिसाने कर्तव्यावर असताना मयत रिक्षा चालकास ओव्हरसिट घेवून जात असताना लायसन्सची मागणी केली असता लायसन्स देणेस नकार दिल्याने त्याचे विरोधात मोटार वाहन अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करून रू.३००० इतका दंड केला होता. तथापि, त्यानंतर दि.१९.०९.२०१६ रोजी रिक्षा चालक संघटनेकडून दि.१२.०९.२०१६ रोजी रिक्षा चालकास मारहाणीमुळे त्याचा मृत्यू झाला असल्याचे व संबंधितांवर कारवाई होणेबाबत उल्हासनगर पोलीस ठाणेस निवेदन देण्यात आले आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने सहायक पोलीस आयुक्त यांच्या स्तरावरून चौकशी सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळंब आदिवासी ठाकूरवाडी (ता.सुधागड, जि.रायगड) येथील बौध्द वस्तीसाठी मंजूर झालेल्या साकवाचे बांधकाम फॉर्महाऊससाठी बांधण्यात येत असल्याबाबत**

**(६) ६६८९० (१६-१२-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (ता.सुधागड, जि.रायगड) येथील आदिवासीवाडी बौध्द वाडीकडे जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे सदर रस्त्यावर साकव बांधण्याकरिता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग महाड जिल्हा परिषद रायगड यांचेकडून विशेष घटक लेखाशिर्षांतर्गत सदर काम मंजूर संस्थेला देण्याकरिता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अलिबाग, जि.रायगड यांना मान्यता देण्याकरिता दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साकवचे काम वरील ठिकाणी न करता श्री.पंडीत फार्म हाऊसला लागून असलेल्या नदीवर डाकेवाडी, धनगरवाडी वर जाणाऱ्या रस्त्यावर करण्यात येत असल्याचे कळंब आदिवासी ठाकूरवाडी रहिवाशी संघाने, जिल्हा उपनिबंधक अलिबाग जि.रायगड यांचेकडे दिनांक ८ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास केलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक १ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, रायगड यांना लेखापत्राद्वारे कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व विशेष घटक योजनेअंतर्गत मागासवर्गीय दलित वस्तीसाठी मंजूर झालेल्या ३० लाख रुपये खर्चाच्या साकवाचे काम अन्यत्र करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व सदरचा साकव नियोजित ठिकाणी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०७-२०१७) :**(१) व (२) विशेष घटक योजनातंर्गत कळंब बौध्दवाडी व धनगरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधण्याचे काम मंजूर होते. तथापि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अलिबाग यांना पाठविलेल्या दि. २२/८/२०१४ च्या पत्रात अनवधानाने कामाचे नाव कळंब आदिवासी बौध्दवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधणे असे नमूद करण्यात आले आहे. सदर पत्राच्या आधारेच रहिवासी संघाने दि. ८/६/२०१६ रोजी तक्रार केली आहे.

(३) होय.

(४) व (५) ग्रामस्थांच्या मागणीनुसारच कळंब बौध्दवाडी व धनगरवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर साकव बांधण्याचे काम मंजूर करण्यात आलेले आहे. सदर मंजूर काम नियोजित ठिकाणीच पूर्ण करण्यात आले असल्याने कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी शहरातील आसबीबी नाचण कम्पाऊंड येथील मे. एन.एफ. टेक्सटाईल्सच्या मालकाने विक्रीकर बुडविल्याबाबत

**(७) ६७१५१ (१७-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील आसबीबी नाचण कम्पाऊंड येथील मे. एन.एफ. टेक्सटाईल्स चे मालक श्री. मुस्तफा कमालउद्दीन अंसारी या कापड व्यापाराने १६ महिन्यांच्या कालावधीत विक्री केलेल्या कापडावरील शासनाचा ११ लाख २५ हजार रुपयांचा विक्रीकर बुडविल्याने विक्रीकर अधिकारी यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान पोलिस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. एन.एफ. टेक्सटाईल्स कंपनीने सदर विक्रीकराची रक्कम शासकीय कोषागारात अद्याप भरली नसल्याचे विक्रीकर अधिकाऱ्यांच्या तपासात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी आरोपीविरुध्द भिवंडी शहर पोलीस स्टेशन, भिवंडी येथे गु.र.क्र. II १४५/२०१६ मुल्यवर्धीत कर कायदा सन २००२ चे कलम ७४(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात असून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंब्रा कौसा (जि.ठाणे) येथील बायपास मार्गावरुन जाणारे ट्रक, कंटेनर चालकांना लुटणा-या टोळीला अटक करण्यात आल्याबाबत**

**(८) ६८२५० (११-०१-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा कौसा (जि.ठाणे) येथील बायपास मार्गावरुन जाणारे ट्रक, कंटेनर चालकांना लुटणाऱ्या टोळीला ठाणे पोलीसांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर टोळीतील मुख्य सुत्रधारासह आरोपी अद्यापही फरार असून अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एम.डब्ल्यु.आर.आर.ए. च्या अनावश्यक हस्तक्षेपामुळे पुरपरिस्थिती गंभीर झाल्याबाबत**

**(९) ७०६७५ (०९-०१-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.डब्ल्यु.आर.आर.ए ने दिनांक ३० जुलै, २०१६ रोजी वा त्या दरम्यान कालव्यातून पाणी न सोडण्याचे आदेश दिल्यामुळे दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी गंगापूर/ दारणा/पालखेड धरणातील पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करणे भाग पडल्यामुळे शेतक-यांच्या शेतात पाणी जाऊन शेतीचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आप्तकालीन परिस्थितीत जिल्हाधिकारी यांना निर्णय घेण्याचे अधिकार असतांना एम. डब्लु आर. आर. ए. ने हस्तक्षेप कोणत्या कायदयान्वये केलेला आहे,

(३) असल्यास, अनावश्यक हस्तक्षेप करुन पुर परिस्थिती अधिक गंभीर होण्यास कारणीभूत अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक ३०.०७.२०१६ रोजी वा त्या दरम्यान कालव्यातून पाणी न सोडण्याचे कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

दिनांक २.०८ २०१६ रोजीच्या अतिवृष्टीमुळे गंगापुर / दारणा / पालखेड धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली. या धरणांच्या कालव्यांची वहन क्षमता पुरविसर्गाच्या परीमाणाच्या तुलनेत अत्यंत तोकडी आहे. शिवाय मंजूर जलाशय

परीचालन प्रणालीनुसार (ROS) तात्कालीक पाणीसाठ्याच्या परिस्थितीनुसार त्या त्या वेळी सदरचे पुर विसर्ग सांडव्याद्वारे नदीपात्रामध्ये सोडणे क्रमप्राप्त होते. या विसर्गामुळे तसेच धरण क्षेत्राच्या खालील भागातील पाणलोट क्षेत्रातील अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती उद्भवली.

पावसाळ्यात उर्ध्व गोदावरी खो-यात विविध जलाशयातील समन्यायी पाणीवाटपासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि. १९/९/२०१४ च्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येते. परंतू ही पूरपरिस्थिती महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या आदेशाची अंमलबजावणी केल्यामुळे उद्भवली नसून अतिवृष्टीमुळे उद्भवली आहे.

अतिवृष्टी/पूरपरिस्थिती या कारणांमुळे शेतातील पिकांचे व फळपिकांचे तसेच खरडल्यामुळे शेत जमिनीचे नुकसान झाले असल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिला आहे.

(२) टंचाईच्या काळात पिण्यासाठी पाणी राखून ठेवण्याचे व धरणातून पिण्यासाठी पाणी सोडण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार शासन निर्णय, दिनांक ०७.०९.२०१५ अन्वये जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त यांना आहेत.

तथापि “महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५” या कायद्यानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला राज्यातील नदी खो-यातील पाणी समन्यायी तत्वावर वाटपासंदर्भात निवाडा करण्याचे अधिकार आहेत. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण ही अर्धन्यायीक स्वरुपाची यंत्रणा असून प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांचे पालन करणे सर्व संबंधीतांवर बंधनकारक आहे. तसेच प्राधिकरणाच्या दिनांक १९ सप्टेंबर २०१४ च्या निवाड्यातील समन्यायी पाणी वाटपासंदर्भातील आदेशांचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३.०९.२०१६ च्या निवाडयातील कलम १९५ (iii) अन्वये दृढीकरण केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात अवैध दारूची विक्री होत असल्याबाबत**

**(१०) ७२५९६ (१८-०१-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात पोलीस विभागाने काही ठिकाणी छापे टाकुन अवैध दारू विक्रेत्याकडून मोठया प्रमाणात दारूसाठा जप्त केल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यवाहीमुळे यवतमाळ जिल्हयात अनेक ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील अवैध दारू विक्री रोखण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :**(१) यवतमाळ जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०१६ वा त्या दरम्यान पोलीसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे छापे घालून ४६,५५,९४१/- रुपयाचा दारु साठा जप्त करुन ३२० केसेस मुंबई दारुबंदी कायद्यान्वये दाखल करण्यात आल्या आहे. सदर ३२० केसेस मध्ये ३२७ आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेल आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, मागील तीन वर्षात यवतमाळ पोलीसांकडून खालील प्रमाणे मुंबई दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | वर्ष | एकूण केसेस | एकूण आरोपी संख्या | एकूण जप्त माल किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | २०१४ | २५६४ | २५६८ | १,२६,२९,७५९ |
| २ | २०१५ | ३२८८ | ३३०९ | २,३५,६४,३२४ |
| ३ | २०१६ | ३३६८ | ३३८७ | २,७४,७७,८९४ |

(३) जिल्ह्यात अवैध दारु विक्री रोखण्यासाठी पोलीसांकडून वेळोवेळी माहिती काढून त्या आधारे छापे घालून मुंबई दारुबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात येते. तसेच अवैध दारुचा व्यवसाय करणाऱ्यांविरुध्द कलम ९३ मु.प्रो.का. अन्वये मागील ४ वर्षात खालील प्रमाणे प्रतिबंध कारवाई सुध्दा करण्यात आली आहे.

| वर्ष | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ |
|---|---|---|---|---|
| एकूण केसेस | १७२९ | १०४१ | ९०० | ८३६ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत कमी किंमतीत फ्लॅटचे देण्याचे आमिष दाखवून ८ लाख रुपये घेऊन दोन बांधकाम व्यावसायिकाने पलायन केल्याबाबत**

**(११) ७३८४७ (२०-०४-२०१७). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कमी किंमतीत फ्लॅटचे देण्याचे आमिष दाखवत एका कुटुंबाकडून ८ लाख रुपये घेऊन सांताक्रुझ येथील दोन बांधकाम व्यावसायिकाने पलायन केल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधकाम व्यावसायिकांविरुध्द सांताक्रुझ पोलीस ठाण्यात गुन्हा आठ महिन्यांनंतर पोलीसांनी नोंदविला असून पुढे कारवाई करण्यास पोलीसांकडून दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे.

दि. १५, जानेवारी २०१६ रोजी अशी तक्रार प्राप्त नाही.

तथापि, कर्जत येथे एका इसमाने दोन गैरअर्जदार यांचे कडून आठ लाख रुपये दरात एक फ्लॅट घेण्याचे ठरवुन ४ लाख रुपये दिले. परंतु सदरहू बाधंकाम न झाल्याने अर्जदार यांनी वांरवांर पैशांची मागणी केली असता अर्जदार यांना फ्लॅट न देता त्यांचे ४ लाख रुपये इतकी रक्कम परत केली नाही. याप्रकरणी दि. १८.०५.२०१६ रोजी गैरअर्जदार यांनी फसवणूक केल्याप्रकरणी सातांक्रुझ पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे.

(२) व (३) नाही,

वरील तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी कामी अर्जदार यांना कळविले असता प्रस्तुतचे प्रकरण हे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात आपआपसात पैसे देवाणघेवाणबाबत होते. त्यामुळे, सन २०१२ ते २०१६ या कालावधीत झालेल्या व्यवहाराबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा किंवा कसे याबाबत विधी अधिकारी यांचेकडे दि. २४.०९.२०१६ रोजी अंतिम निर्णयाप्रकरणी प्रकरण सादर केले असता प्राप्त आदेशानुसार दोन गैरअर्जदार यांच्याविरुध्द गु.र.क्र. ०४/२०१७ कलम ४२०, ३४ भादविसं प्रमाणे फसवणुकीचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद प्रकरणाच्या तपासात कोणतीही दिरंगाई झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सम्येक निवास हक्क संघ प्रायोजक भिम फाऊंडेशन या संस्थेचे "सम्यक निवास हक्क संस्था" (जन-सन अपना घर) या योजनेंतर्गत नागरिकांची फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(१२) ७४२६० (२०-०४-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सम्येक निवास हक्क संघ प्रायोजक भिम फाऊंडेशन या संस्थेचे "सम्यक निवास हक्क संस्था" (जन-सन अपना घर) या योजनेंतर्गत ०% डाऊनपेमेंट, ७% व्याज, १००% कर्ज, ३२५ चौ.मी करिता ७५० रु दरमहा डोनेशन भरून स्वत:चे घर मिळविण्याचे आमिष दाखवून सदर संस्थेने नागरिकांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिका नोंदणीसाठी संस्थेने नागरिकांकडून ११०० रु रोख घेतले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त प्रकरणी समर्थ पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.र.नं.०९/२०१५, भा.दं.वि. कलम ४०६, ४२० प्रमाणे मधुकर विठ्ठल सुर्यवंशी, संस्थापक सम्यक निवास हक्क संघ, भिम फाऊंडेशन यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याच्या तपासात सदर गृहप्रकल्प संस्थेने ४७० नागरिकांची रु.४,६२,३४,२०५/- इतक्या रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपीचा कसोशीने शोध घेतला असता तो मिळून आलेला नाही. सदर गुन्ह्याची तुर्त “अ” वर्ग समरी मंजुर होणे कामी दिनांक १४/०६/२०१७ रोजी अहवाल पाठविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (मुंबई) येथील फिल्टरपाडा येथे जांभळी मैदानात रॉबिनन्स आर-४४ हे हेलिकॉप्टर कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू व तीन जण जखमी झाल्याबाबत**

**(१३) ७४३०९ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील फिल्टरपाडा येथे जांभळी मैदानात दुपारी रॉबिनन्स आर-४४ हे हेलिकॉप्टर कोसळून एका व्यक्तीचा मृत्यू व तीन जण गंभीर जखमी झाल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हेलिकॉप्टर मूळचे पवनहंस कंपनीच्या मालकीचे असून अमल एव्हीएशन या खाजगी कंपनीने ते विकत घेऊन खाजगी उड्डाणासाठी त्याचा वापर करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमन एव्हीएशन कंपनीने व्यवसाय करण्याची परवानगी केंद्र वा राज्य शासनाकडून न घेता, शासनास कर न भरता, हेलिकॉप्टरचा विमा न उतरविता, हेलिकॉप्टरची देखभाल वेळच्यावेळी न करता मुदतबाहय हेलिकॉप्टरचा वापर करित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी डी.जी.सी.ए. यांचेमार्फत अपघातग्रस्त हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आली आहे काय, तपासात काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) सदरहू प्रकरणी दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी झालेल्या हेलिकॉप्टर दुर्घटनेमध्ये तिन व्यक्तींचा मृत्यु झालेला असून एक व्यक्ती जखमी झालेला आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर प्रकरणाचा डी.जी.सी.ए. (Director General Civil Aviation) यांचेमार्फत अपघातग्रस्त हेलिकॉप्टरची तपासणी करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील इंडिका रेमेडीज लिमिटेड कंपनीची ७५ लाखांची फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(१४) ७४५२८ (२१-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील इंडिका रेमेडीज लिमिटेड कंपनीने तयार केलेल्या औषधांचे उत्पादन बाजारात पोहचविणारे नागपूर परिसरातील दिनेशचंद्र गुप्ता यांच्या चंद्रा एन्टरप्रायजेस या संस्थेने बोगस इ-मेल आयडी तयार करुन दिनाक ३ एप्रिल, २०१४ ते दिनांक २ मे, २०१६ या कालावधीत वेळोवेळी आर्डर देवून अंबाझरी नागपूर, जवाहरनगर भंडारा, चंद्रपूर तसेच मिलिटरी हॉस्पिटल, कामठी येथे कमी दरात औषधे पुरविल्याचे कागदोपत्री बनावटरित्या दाखवून ७५ लाखांची फसवणूक केल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीने वाडी पोलीस ठाण्यामध्ये लेखी तक्रार केली असूनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणातील आरोपी नामे दिनेश गुप्ता हे चंदा इंन्टरप्रायजेस चे मालक असून ते इंडिको रेमडीज लिमिटेड कंपनीचे चे डिस्ट्रब्युटर असुन त्यांनी ऑर्डनन्स फॅक्टरी व मिल्ट्री हॉस्पिटल चे बनावट ऑर्डर कॉपी तयार करुन ती खरी आहे असे भासवून त्याचा वापर केला व कंपनीकडून सरकारी हॉस्पिटलच्या नावाने कमी दरात औषधी मागणी करुन ती औषधे दुसरीकडे विक्री करुन कंपनीची ७५ लाख रुपयांची फसवणुक केली या कारणास्तव फिर्यादीचे तक्रारीवरुन वाडी पो.ठाणे येथे अप क्र.२५/२०१७ कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयातील आरोपी नामे दिनेश चंद्रा गुप्ता यांने मा.न्यायालयात अटक पूर्व जामीनाबाबत अर्ज दाखल केला असुन, सदरचा गुन्हा पोलीस तपासावर आहे.

तसेच चंद्रपूर/भंडारा जिल्हयात सदर प्रकरणी फसवणूकीबाबत गुन्हे/तक्रारी दाखल नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मुंबई तसेच ठाणे शहरात मटक्यावर बंदी असतानाही**
**चिट्टी मटका खेळला जात असल्याबाबत**

**(१५) ७५५१५ (२१-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई तसेच ठाणे शहरात मटक्यावर बंदी असताना काही भागात मटका हा चिट्टी मटक्याच्या रूपाने खेळला जात असून निश्चलीकरणानंतर नोटांची टंचाई असल्यामुळे चिट्टीवर जिंकलेली रक्कम लिहून दिली जाऊन पुन्हा ती रक्कम मटक्यावर खेळता येत असल्याचा प्रकार अनेक ठिकाणी सुरु असल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले असून सदर प्रकरणी माहिती घेवून कारवाई करण्यात येईल असे सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था यांनी सांगितले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई तसेच ठाणे शहरात सुरु असलेला मटक्यावर स्थानिक पोलिसांकडून कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन आरोपींवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), बृहन्मुंबई यांनी याबाबत चौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत. परंतू अशाप्रकारचा मटका मुंबई शहरामध्ये कोठेही सुरु असल्याचे आढळून आलेले नाही.

तथापि, या प्रकारच्या घटना ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ४ उल्हासनगर हद्दीत घडलेल्या आहेत.

(२) सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-४, उल्हानगर हद्दीत सन २०१६ व २०१७ मध्ये खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| कालावधी | दाखल गुन्हे | अटक आरोपी संख्या | दोषारोप दाखल गुन्हे संख्या |
|---|---|---|---|
| सन २०१६ | ३६ | १३३ | २९ |
| दि. १.१.१७ ते ३१.५.१७ | १३ | ४४ | २ |

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**१० हेक्टरपेक्षा कमी आराजी असलेल्या जमीनीचे रहिवासी वापरासाठी अधिग्रहण करण्यासाठी शासनाचे स्पष्ट निर्देश नसल्याबाबत**

**(१६) ७५६३० (२०-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये निर्देश देऊन जमीन वापराच्या बदलामध्ये फेरबदल करण्याच्या प्रक्रियेत शासन निर्णय क्र.टिपीएस. १३-नवि/१५/४९क्र.प्र./१८१५, मंत्रालय,मुंबई दिनांक ०४.०१.२०१६ च्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे काही मुद्दे सुधारीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिशिष्ट-अ मधील अनुसूची-मुद्दा/ ड१ अन्वये रहिवासी वापरासाठी जमीनीचे क्षेत्र अधिग्रहण करताना छाननी समितीने सर्वसाधारणपणे १० हेक्टर ते २५ हेक्टर पर्यंतचे क्षेत्र विचारात घ्यावे असे नमुद असल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जर १० हेक्टरपेक्षा कमी आराजी असलेल्या जमीनीचे रहिवासी वापरासाठी अधिग्रहण करण्यासाठी शासनाचे स्पष्ट निर्देश नसल्यामुळे अशा जमीनी अधिग्रहण करण्यासाठी शासनाने कार्यवाही केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१७) :**(१) होय, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६, अन्वये मंजूर केलेल्या प्रादेशिक योजनेतील प्रस्तावामध्ये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या फेरबदला संदर्भाने करावयाची कार्यपध्दती शासनाने दि.०६/०५/२०१५ रोजीचे निदेश क्र.टिपीएस-१८१५/प्र.क्र.४९/१५/नवि-१३, अन्वये निश्चित केलेली आहे. सदर प्रक्रिया अधिक नियोजनपुर्ण, पारदर्शक व अधिक वस्तुनिष्ठ होण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने दि.११/०६/२०१५ रोजी उक्त अधिनियमाचे कलम-१५४ अन्वये निदेश देवुन कार्यपध्दती व निकष निश्चित केलेले आहेत. उक्त निदेशातील काही मुद्दे शासनाने दि.०४/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सुधारीत केलेले आहेत.
(२) सर्वसाधारणपणे छाननी समितीने फेरबदल प्रस्तावाबाबत १० हे ते २५ हे. पर्यंतचे एकसंघ, एकसामाईक असे क्षेत्र विचारात घेणेबाबत तसेच असे निकष लावतांना त्यामध्ये किमान/ कमाल क्षेत्रामध्ये किरकोळ बदल (+ / - ०.५ हे. पर्यंत) विचारात घेता येईल असे नमूद आहे.
(३) १० हे. पेक्षा कमी क्षेत्राचे प्रस्ताव अतिशय अपवादात्मक परिस्थितीत जसे क्षेत्रफळाच्या वाढीला नैसर्गिक नदी, नाले, रस्ते, डोंगर इ. मुळे आलेली बंधने किंवा सर्व बाजूंनी विकास झाला असल्याने जागेच्या वाढीस आलेल्या मर्यादा अशा प्रकारच्या अपवादात्मक परिस्थितीत परिपत्रकातील इतर निकषांची पूर्तता होत असल्यास तसेच जागेच्या आजूबाजूस मुलभूत सुविधा उपलब्ध असल्यास अशा क्षेत्राचे फेरबदल प्रस्ताव करणे आवश्यक आहे, असे समितीचे मत झाल्यास असे प्रस्ताव पूर्वमान्यतेकरिता शासनाकडे सादर करावेत, शासनाने संमती दिल्यास पुढील कार्यवाही समितीच्या स्तरावर करावी. असे शासनाने दि.०४/०१/२०१६ रोजीच्या कार्यपध्दतीमध्ये स्पष्ट केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किनवट (जि.नांदेड) येथील मुळझरा तलावातील कॅनालची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) ७६४३६ (१५-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) येथील मुळझरा तलावात मुबलक पाणीसाठी असुनही कॅनाल दुरुस्तीच्या नावाखाली पाटबंधारे विभाग पाणी सोडण्यास दुर्लक्ष करत असल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॅनाल दुरुस्ती करण्याचे लेखी आश्वासन शेतकऱ्यांना देऊनही अनेक महिन्याचा कालावधी उलटूनही सदरहू कॅनाल दुरुस्ती केली नसल्याने पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षामुळे मुळझरा, कोल्हारी, भीसी या तीन गावांच्या शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम वाया जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कॅनालची दुरुस्ती करण्याबाबत व दुरुस्ती करण्यास दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही. मुळझरा तलावातून रब्बी हंगामासाठी पाणी आवर्तन देण्यासंदर्भात मुळझरा, भिसी व कोल्हारी येथील शेतक-यांचे निवेदन दि.१३.१२.२०१६ रोजी प्राप्त झाले असून निवेदनाकडे कोणतेही दुर्लक्ष न करता मुळझरा तलावातून दि.१८.०१.२०१७ रोजी पाणी सोडण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

भराव कामातून होणारा अल्प पाझर थांबविण्याचे दृष्टीकोनातून आवश्यक कामे करुन पाणी कालव्यात सोडण्यात आले.रब्बी हंगाम २०१६-१७ मुळझरा प्रकल्पाच्या दि.१५.१०.२०१६ च्या उपलब्ध पाणीसाठया नुसार २०० हे. सिंचनाचे उद्दिष्ट होते. रब्बी हंगामा अखेर प्रकल्पात मोजणीअंती १५९ हे. सिंचन झाले आहे. त्यामुळे उपरोक्त तीन ही गावातील शेतक-यांचा रब्बी हंगाम वाया गेलेला नाही. नादुरुस्त कालवा लांबीतील (मा.क्र.१ व २) भराव कामे २०१७-१८ वर्षात यांत्रिकी विभागाकडून करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील विसापूर येथील विश्रामगृहात पाणी नियोजनाबाबत आयोजित करण्यात आलेली बैठक**

**(१८) ७६६३१ (१७-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील विसापूर येथील शासकीय विश्रामगृहात कुकडीचे संस्थापक यांच्या अध्यक्षतेखाली पाणी नियोजनाबाबत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीस कोणकोणते अधिकारी उपस्थित होते तसेच या बैठकीत कोणकोणते निर्णय घेण्यात आले व सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२७-०७-२०१७) :**(१) होय. दिनांक १५.१२.२०१६ रोजी शासकीय विश्रामगृह, विसापूर, ता.श्रीगोंदा येथे विसापूर मध्यम प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीची बैठक श्री.सु.ना.कोळी, अध्यक्ष, कालवा सल्लागार समिती (विसापूर प्रकल्प) तथा कार्यकारी अभियंता यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

(२) सदर बैठकीस अध्यक्ष, कालवा सल्लागार समिती तथा कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२, श्रीगोंदा, उपविभागीय अधिकारी, कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.५ श्रीगोंदा, शाखाधिकारी ,विसापूर सिंचन शाखा, बेलवंडी व शाखाधिकारी ,विसापूर धरण शाखा,बेलवंडी हे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

(१) विसापूर कालव्याच्या सा.क्र.० ते १३.५०० कि.मी. दरम्यानच्या लांबीतील अस्तरीकरणाच्या कामासाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(२) प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व पाणी वापर संस्थांना त्यांच्या कार्यक्षेत्रात सर्व चाऱ्यांची दुरुस्ती पूर्ण करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

(३) विसापूर कालवाच्या चिंभळा चारीला विसापूर कालवाच्या आवर्तना दरम्यान पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरात हद्दवाढीचा निर्णय होण्यासाठी स्वतंत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्ताव**

**(१९) ७६९४१ (२१-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराच्या हददवाढीला विरोध झाल्यानंतर शहर व ग्रामीण भागाच्या समतोल विकासासाठी कोल्हापूरला स्वतंत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्तावासंदर्भातील जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शहराची हददवाढीसंदर्भात तात्काळ निर्णय व्हावा याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१७) :**(१) होय. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सदर विषयी त्यांचा अहवाल दि. १०/०१/२०१७ रोजी शासनास सादर केला आहे.

(२) उक्त अहवालानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील ४२ गावे, कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्र, कागल नगर परिषद क्षेत्र, आणि वडगाव नगर परिषद क्षेत्र या सर्वांचा समावेश असलेल्या क्षेत्राकरिता क्षेत्र विकास प्राधिकरण (Area Development Authority) शासनाने स्थापन करावे अशी शिफारस जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी शासनास केली आहे.

(३) व (४) सदर प्रस्तावामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४२ क चे उप कलम (१) व (२) नुसार कोल्हापूर नागरी विकास क्षेत्र घोषीत करण्याची व उक्त अधिनियमाच्या कलम ४२ ग चे उप कलम (१) व (३) नुसार उक्त नमूद क्षेत्राकरिता कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण घोषित करण्याची कार्यवाही नगर विकास विभागाकडून सुरु आहे.

---

**करमाळा (जि.हिंगोली) येथील बायपास चौकातील उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याबबत**

**(२०) ७७१०१ (२१-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.हिंगोली) येथील बायपास चौकातील उड्डाणपूलाचे काम प्रलंबित असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूकोंडी होत असून अनेकवेळा येथे लहान मोठे अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उड्डाणपूलाचे रखडलेले काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०८-२०१७) :**(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील करमाळा बायपासवरील बार्शी चौकातील सबवेचे काम अपूर्ण आहे. मात्र अपघात झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) सबवेचे काम अपूर्ण काम पूर्ण करण्याबाबत उद्योजकास सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील गुरुकुंज उपसा सिंचन मोझरी योजनेची कामे पुर्ण करण्याबाबत**

**(२१) ७७२२३ (१५-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) तालुक्यातील गुरुकुंज उपसा सिंचन मोझरी या योजनेला दिनांक १३ जुलै, २००९ रोजी वा त्यासुमारास मान्यता मिळूनही या योजनेतील कामे अद्यापही प्राथमिक स्तरावरच असल्याने या योजनेतील विलंबाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर योजनेची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) होय.

गुरुकुंज उपसा सिंचन योजना ही उर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत प्रस्तावित असून सदर प्रकल्पास दिनांक १३/७/२००९ रोजी चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.
(२) व (३) सदर काम उपसा सिंचन योजनेचे असल्यामुळे उपसा सिंचन योजनेची परीगणके स्थायी समिती मार्फत अंतिम केली जातात. योजनेच्या पंपगृहाचे ठिकाणी विशिष्ट भुस्तरामुळे पायाचे [foundation] संकल्पनात अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे योजनेसाठी सबमर्सीबल पंप, हॉरीझाँटल स्पिल्ट केसींग पंप व व्हर्टीकल टर्बाईन पंप असे विविध प्रकार व त्यामुळे होणारे बदल तपासण्यात आले व दि. ७/१०/२०१६ च्या स्थायी समितीच्या बैठकीत ३ नग व्ही. टी. पंप (५९५ अश्वशक्ती प्रत्येकी) अंतिम करण्यात आली. त्यानुसार दिनांक २१/३/२०१७ रोजी मध्यवर्ती संकल्पचित्र पंपगृहाचा सर्व साधारण आराखडा प्राप्त झाला आहे. या योजनेची ५०४० मी. ची संपूर्ण उर्ध्व गामी नलिका जमीनीमध्ये टाकण्यात आली आहे. पंपगृहाचे काम माहे १२/२०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पंपाचे काम यांत्रिकी विभागामार्फत तसेच ३३ केव्ही एक्सप्रेस फिडर व कळयंत्राचे काम विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभागामार्फत माहे ३/२०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सिंचन क्षेत्र विकसित करण्यासाठी सदर काम बंद नलिका वितरण प्रणालीव्दारे करण्याचे नियोजित आहे. जुन २०१८ अखेर ३५०० हे. सिंचन क्षमता व उर्वरीत ३६०९ हे. सिंचन क्षमता माहे जून-२०१९ अखेर निर्माण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथे महिला गुन्हेगारांची संख्या वाढत असल्याबाबत

**(२२) ७७२८२ (२१-०४-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत गत सहा वर्षात १८ हजार ४११ महिलांना विविध गुन्ह्यांखाली पोलिसांकडून अटक करण्यात येवून महिला गुन्हेगारांच्या संख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महिलांसाठी विशेष सेल स्थापन करूनही पोलीस दलाला यावर नियंत्रण ठेवण्यास अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात विविध गुन्हयाखाली पोलीसांकडून अटक करण्यात आलेल्या महिला गुन्हेगारांची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **सन** | **अटक महिला गुन्हेगार** | |
|---|---|---|
| | **भा.द.वि. गुन्हयांखली** | **इतर गुन्हयांखली** |
| २०१० | २१२७ | ११०४ |
| २०११ | २५९९ | ११४२ |
| २०१२ | २५३८ | ६६४ |
| २०१३ | ३११५ | १०१२ |
| २०१४ | ३८३४ | ६१९ |
| २०१५ | ४३९७ | १०६९ |
| २०१६ (सदर आकडेवारी अंतरिम स्वरुपाची आहे.) | ३३०५ | ९६० |

सन २०१५ च्या तुलनेत सन २०१६ मध्ये अटक करण्यात आलेल्या महिला गुन्हेगाराची संख्या घटत आहे.

सन २०१० ते २०१५ या सहा वर्षाच्या कालावधीत भा.द.वि गुन्हयांखाली अटक करण्यात आलेल्या एकुण महिला गुन्हेगारांची संख्या ही १८,६१० इतकी होते. सन २०१४ च्या तुलनेत सन २०१५ मध्ये भा.द.वि गुन्हयांखाली अटक करण्यात आलेल्या एकुण महिला गुन्हेगारांची संख्या ही ५६३ ने वाढ झालेली आहे.

(२) सदरहू प्रकरणी महिला गुन्हेगारीला आळा घालणेकरीता विशेष सेल स्थापन करण्यात आलेले नाही. तथापि, बृहन्मुंबई पोलीस दलाकडून सर्व प्रकारची गुन्हेगारी रोखणेकरीता सातत्याने व नियमित प्रयत्न करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चौके (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या शाखेत सुर्वणकाराच्या साथीने अपहार केल्याबाबत**

**(२३) ७७४४७ (२१-०४-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौके (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या शाखेत सुर्वणकाराच्या साथीने सुमारे २२ कर्जदारांनी ७० लाख रुपयांहून अधिक रक्कमेचा अपहार केला असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेचे शाखाधिकारी यांच्या तक्रारीवरुन सुवर्णकारासह नऊ जणांवर भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर फरार सुवर्णकार आणि त्याची पत्नी यांचा ठावठिकाणा माहित असून सुध्दा पोलीसांकडून कोणत्याही प्रकारची सक्षम कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनस्तरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच फरार आरोपीला पकडण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :**(१) चौके (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या शाखेत सुवर्णकाराच्या साथीने २४ कर्जदारांनी ५३,९५,२००/- रुपये इतक्या रक्कमेची फसवणूक केली असल्याचे दिनांक १९.०१.२०१७ रोजी निदर्शनास आले आहे.
(२) सदर प्रकरणी विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा चौके चे ब्रँच मॅनेजर यांच्या तक्रारी वरुन सुवर्णकारासह २५ जणांवर भा.द.वि. ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी बँकेचे शाखा अधिकारी यांच्या फिर्यादीवरुन मालवण पोलीस ठाणे येथे १० आरोपींविरुध्द गुन्हा रजिस्टर नं.७/२०१७ भा.द.वि. कलम ४२०,४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ तसेच तद्नंतर आणखी १५ आरोपी विरुध्द मालवण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नं.८/२०१७ भा.द.वि. कलम ४२०,४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे. उपरोक्त नमुद दोन्ही गुन्हयातील एकुण २५ आरोपीपैकी २४ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तर सुवर्णकाराची फरारी पत्नी हीचा शोध घेण्याची कारवाई चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरात ऑन लाईनच्या माध्यमातून अनेक नागरीकांचे बॅक खात्यातून सुमारे ९ लाख रुपये गायब झाल्याबाबत

**(२४) ७७५०९ (२१-०४-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) परिसरात ऑन लाईनच्या माध्यमातून सन २०१५ ते २०१७ पर्यंत अनेक नागरिकांचे बँक खात्यातून सुमारे ९ लाख रुपये परस्पर गायब झाल्याची तक्रार टिळकनगर पोलीस ठाणे, डोंबिवली येथे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी तपास करुन आरोपींना पकडण्यात यश आले आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

सदरहू प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील कल्याण परिमंडळ ३ हद्दीतील टिळकनगर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात एका तक्रारदाराच्या खात्यातील ९,५४,३३५/- रुपये अज्ञात इसमाने अपहार केल्याप्रकरणी टिळकनगर पो.स्टे. गु.र.क्र. I७/२०१७ भा.द.वि.कलम ४२० सह आयटी ॲक्ट ६६(क), (ड) प्रमाणे दि. २०.०१.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरचा गुन्हा तपासाधिन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे वनसगांव व ब्राम्हणगांव वनस (ता.निफाड, जि.नाशिक) येथील पिण्याच्या पाण्यासाठी पालखेड डावा कालव्यास एस्केप वितरिका मंजूर करणेबाबत

**(२५) ७८१७० (१७-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वनसगांव व ब्राम्हणगांव वनस (ता.निफाड, जि.नाशिक) येथील पिण्याच्या पाण्यासाठी पालखेड डावा कालव्यास एस्केप वितरिका मंजूर करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर मागणीनुसार प्रस्ताव सादर करण्याचे शासनाने मुख्य अभियंता,जलसंपदा यांना दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर निर्देशनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) होय.

(२) होय. दि.१३.०१.२०१७ च्या पत्रावर मा.मंत्री जलसंपदा यांनी उचित कार्यवाही करावी अशा सूचना दिलेल्या आहेत.

(३) सदर निर्देशानुसार शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून एका वाहनातून दोन सोन्याचे बिस्कीट, दोन मोबाईल व रोख रकम मारुती गाडीसह १० लाखाचा मुददेमाल जप्त केल्याबाबत

**(२६) ७८७३० (२१-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून एका वाहनातून दोन सोन्याचे बिस्कीट, दोन मोबाईल व रोख रकम मारुती गाडीसह एकूण १० लाखाचा मुददेमाल जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी तीन इसमांविरुध्द त्यांच्या संशयास्पद हालचालीवरुन पोलीस ठाणे रामनगर, जि.चंद्रपूर येथे दि. २९/१२/२०१६ रोजी फौ.प्र.सं. कलम ४१(१) (ड), सह कलम १२४ मु.पो. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपीस मा न्यायालयाने जामीन मंजूर केला असून सदर गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळा (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण भागात अवैध दारु विक्रीचे धंदे तेजीत सुरु असल्याबाबत**

**(२७) ७८७७४ (२०-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळा (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण भागात राजरोसपणे गावठी दारुच्या भटटया लावून अवैध दारु विक्रीचे धंदे तेजीत सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७)** :(१) माहे जानेवारी, २०१७ तळा पोलीस ठाणे (जि. रायगड) येथे अवैध दारु विक्री संदर्भात म. प्रोव्ही. कायदयान्वये ०१ गुन्हा दाखल असून त्यामध्ये १० लिटर तयार गावठी हातभट्टीची दारु किंमत रुपये ५००/- चा माल जप्त करण्यात आलेला आहे.
(२) उक्त प्रकरणी अवैध दारु विक्री संदर्भात तसेच अवैध दारुधंद्यांचे समुळ उच्चटन करण्यासाठी विशेष मोहीम राबवुन माहे जानेवारी, २०१७ तळा पोलीस ठाणे मध्ये गु.र. नं. ०४/२०१७ म. प्रोव्ही. का. कलम ६५ (खंड) ई अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदर आरोपीता विरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळाचौकी (मुंबई) पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने होत असलेल्या घरफोडीच्या व चोरींच्या घटनांबाबत**

**(२८) ७८८१८ (२०-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळाचौकी (मुंबई) पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने घरफोडीच्या व चोरीच्या घटना घडत असल्याची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार गत दोन वर्षात काळाचौकी पोलीस ठाण्यात घरफोडीच्या व चोरीच्या एकूण किती घटना घडल्या आहेत आणि त्यापैकी किती गुन्ह्यांचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे,
(३) असल्यास, उक्त पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी व चोरीच्या घटना रोखण्यासाठी शासनाकडून आजतागायत कोणत्या ठोस उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :**(१) काळाचौकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन घटना घडल्या असून त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) गुरक्र. २६/१७ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि दाखल असून सदरचा गुन्हा महात्मा गांधी रुग्णालय, मुंबई येथे घडला असून रु. २,५६,०००/- इतक्या किंमती मालाची चोरी झाली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

२) गुरक्र. ३४/१७ कलम ४५४, ३८० भादवि दाखल असून सदरच्या गुन्हयामध्ये डॉ.बी.ए.रोड लालबाग येथे रु.७०,०००/- इतक्या किंमतीचे दागिने चोरीला गेले आहेत. या प्रकरणी एका इसमास अटक केली असून त्याचेकडून वेगवेगळया प्रकारचे दागिने जप्त केले आहे. सदरहू प्रकरणी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(२) गत दोन वर्षात काळाचौकी पोलीस ठाणेमध्ये घडलेल्या घटनांचा अहवाल पुढील प्रमाणे :-

| वर्ष | घरफोडी | | चोरी | |
|---|---|---|---|---|
| | दाखल | उघड | दाखल | उघड |
| २०१५ | १९ | ९ | ११६ | ३८ |
| २०१६ | ५ | २ | ८७ | ३७ |

(३) पोलीस ठाणे हद्दीमध्ये वायरलेस गाडया तसेच बीट अंमलदार व अधिकारी यांना जास्तीत जास्त प्रभावीपणे गस्त करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

नागरिकांना दक्ष राहण्यास सांगुन आपल्या आजुबाजुच्या परिसरात संशयास्पद व्यक्ती आढळुन आल्यास पोलीस हेल्पलाईनवर संपर्क करण्यास सांगितले आहे

मोहल्ला समितीच्या मिटींग आयोजित करुन तसेच तक्रार निवारणाच्या दिवशी नागरिकांना सुट्टीसाठी बाहेरगावी जात असल्यास शेजाऱ्यांना माहिती देण्याच्या तसेच आपल्या घराच्या सुरक्षिततेसंबधी सुचना देण्यात आल्या आहेत.

काळाचौकी पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगारांना वारंवार तपासण्यात येत असते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत**

**(२९) ७९०२८ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आरक्षणाची कोणाला गरज आहे याचा अभ्यास करण्यासाठी बिगर राजकीय समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-८-२०१७) :**(१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर शहरामध्ये विस्थापित झालेल्या सिंधी बांधवांना सुधारित अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३०) ७९०८६ (१२-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर शहरामध्ये भारत-पाक फाळणीनंतर विस्थापित झालेल्या सिंधी बांधवांना तालुका नगर भुमापन, जिल्हा भुमापन अधिकारी व विभागीय नगर भुमापन कार्यालय सुधारित अभिलेख वारंवार मागणी केल्यानंतरही उपलब्ध करून देत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर येथील विस्थापित सिंधी बांधवांना सदर अभिलेख उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे तसेच अभिलेख उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०७-२०१७) :**(१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव-मनमाड-कोपरगांव या राज्य मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३१) ७९१५४ (१५-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगांव-मनमाड -कोपरगांव या राज्य मार्गावर ठिकठिकाणी खड्डे पडून राज्यमार्गाची दुरवस्था झाल्यामुळे वाहन चालकांना वाहन चालवितांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरील मनमाड व येवला शहरातील पथदीप बंद असून पदपाथ व दुभाजकाची दुरवस्था झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीच्या अनुषंगाने सदर मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) याबाबत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात आलेली असून विभागामार्फत चोंडा घाट कि.मी. ११६/०० ते ११७/०० व १२७/०० ते १३१/५०० व येवला शहरातील सा.क्र.१५२/६०० ते १५८/०० या लांबीतील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.

तसेच मध्य दुभाजकातील विद्युत वाहीनीच्या दुरुस्तीचे काम उद्योजकामार्फत प्रगतीपथावर आहे. तद्नंतर पथदिप सुरु राहतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील नाग्यासाक्या धरणाचा कालवा व कालव्यावरील वितरिका अनेक वर्षापासून नादुरुस्त असल्याबाबत**

**(३२) ७९२८६ (२०-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील नाग्यासाक्या धरणाचा कालवा व कालव्यावरील वितरिका अनेक वर्षापासून नादुरुस्त असल्यामुळे रब्बी पिकांसाठी सोडण्यात आलेले आवर्तनाचे पाणी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतीला मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होवून काही शेतकरी पाणी मिळण्यापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाग्यासाक्या धरणाचा कालवा व कालव्यावरील वितरिकांची देखभाल व दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) नाग्यासाक्या मध्यम प्रकल्पाच्या प्रकल्पीय अहवालानुसार खरीप १२०० हे.व रब्बी १२०० हे.इतक्या क्षेत्राची तरतूद आहे. सन २०१६-१७ मध्ये धरण पूर्ण भरल्यानंतर रब्बी हंगामात प्रकल्पीय १२०० हे. क्षेत्रापैकी १०९३.२४ हे. इतके क्षेत्रावर सिंचन झाले आहे. उजवा कालव्यावरील वितरीका क्र.१ वरील जुने नादुरुस्त दगडी अस्तरीकरणावर उपाय योजना करुन गळती व पाणीनाश रोखण्याबाबत अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वरध (ता.राळेगाव) येथील वरध तलावाचे सिंचन कालव्याच्या नादुरुस्तीमुळे शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहचत नसल्याबाबत**

**(३३) ८००२७ (१५-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ पाटबंधारे विभागाच्या वरध (ता.राळेगाव) तलावातून खैरगाव, मोहदरी, सखी, कृष्णापूर या गावातील शेतकऱ्यांना शेतीच्या सिंचनासाठी उजव्या कालव्यातून पाणी उपलब्ध करुन दिले जात असल्याचे दिनांक १२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देखभाल दुरुस्ती अभावी १६ कि.मी लांबी असलेले कालवे नादुरुस्त असल्यामुळे व संबंधीत विभागाचे अधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे सिंचन तलावात उपलब्ध असलेले पाणी शेतक-यांना सिंचनासाठी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नादुरुस्त कालव्याच्या दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत व नादुरुस्त कालवे तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) कालवा नादुरुस्त असल्यामुळे मुख्य कालव्याचे एकूण १६ किमी पैकी ९.५० कि.मी. पर्यंत तलावात उपलब्ध असलेले पाणी सिंचना करीता देण्यात आलेले आहे.

(३) सदर नादुरुस्त कालव्याची पहाणी करुन आवश्यक उपाययोजना करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) मुख्य कालव्यामधील साफसफाई, गाळ गवत काढणे, भराव दुरुस्ती इत्यादी कामे यांत्रिकी संघटनेमार्फत प्रगतीपथावर आहेत. तसेच बांधकामाची दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजित आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोयना धरणातील पाणी महाराष्ट्र राज्य वीज उत्पादक कंपनीला जलविद्युत निर्मितीसाठी कमी दराची सवलत दिल्यामुळे राज्याचे झालेले नुकसान**

**(३४) ८०१६५ (१९-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातून महाराष्ट्र राज्य वीज कंपनीला कोयना जल विद्युत कंपनीसाठी जलविद्युत उत्पादन करण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले असून इतरांना ज्या दराने पाणीपट्टी आकारली जाते त्यापेक्षा अत्यंत कमी दराने वरील कंपनीला जलसंपदा विभागाने पाणी पुरवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार नुकसानाची भरपाई व थकबाकी सदर कंपनीकडून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) होय.

जलसंपदा विभागाने उभारणी करुन वीज निर्मिती करण्यासाठी महानिर्मिती कंपनीकडे भाडेपट्टीने हस्तांतरीत केलेल्या कोयना जलविद्युत प्रकल्पासह २७ जलविद्युत प्रकल्पाची सुधारीत भाडेपट्टी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे याचिका सादर करण्यात आली होती. या याचिकेव्दारे या प्रकल्पांची सुधारित भाडेपट्टी तसेच वीज निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्यावर स्वामित्व शुल्क आकारणी प्रस्तावित करण्यात आली होती. याचिकेवरील निर्णय देताना महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने या प्रकल्पांसाठी भाडेपट्टी मंजूर करताना त्यात पाणी वापरावर स्वामित्व शुल्काचा समावेश केलेला नाही.

त्यामुळे कोयना धरणाच्या वीज निर्मितीसाठी वापरण्यात येत असलेल्या पाण्यावर दर आकारणी करण्यात येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडा विभागासाठी जलसंधारण आयुक्तालय सुरु करण्याबाबत**

**(३५) ८०२३५ (१९-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागासाठी सक्षम जलसंधारण आयुक्तालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंधारण आयुक्तालयासाठी आवश्यक असलेला निधी व प्रशासकीय बाबी यासंदर्भातील प्रस्ताव शासनाने उच्चाधिकार समितीसमोर ठेवण्यासाठी वित्त विभागाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्चाधिकार समितीने जलसंधारण आयुक्तालय सुरु करण्याबाबत काय निर्णय घेतला आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**प्रा. राम शिंदे (२६-०७-२०१७) :**(१), (२) व (३) औरंगाबाद येथे संपूर्ण राज्यासाठी मृद व जलसंधारण आयुक्तालयाची स्थापना करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय दिनांक ३१ मे, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी, औरंगाबाद हे कार्यालय कार्यान्वित झाले आहे.

---

**मौजे गणेशपूर (ता.जि.भंडारा) येथील मंडळ अधिकारी, बेला यांनी गैरव्यवहार केल्याबाबत**

**(३६) ८०३१५ (१२-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गणेशपूर (ता.जि.भंडारा) येथील श्री.खंडशिंगे, मंडळ अधिकारी, बेला हे गत ५ ते ६ वर्षापासून सातबारा मध्ये अवैध फेरफार करुन बेकायदेशीर कामे करीत असल्याने चौकशी करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा.महसूल राज्यमंत्री, जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.खंडशिंगे यांनी भंडारा येथील रेतीमाफिया व मुरुममाफिया यांच्या संगनमताने अवैध रेती उत्खनन करून शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व तद्नुसार श्री. खंडशिंगे यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२४-०७-२०१७) :**(१) यासंदर्भात लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १५.१२.२०१७ चे निवेदन मा. राज्यमंत्री (महसूल) व जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे प्राप्त झाले होते.

(२) असे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) श्री. एस.एम. खंडसिंगे, मंडळ अधिकारी, बेला. जि. भंडारा यांचेविरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, भंडारा यांना प्रस्तुत प्रकरणात आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या स्तरावर संबंधित मंडळ अधिकाऱ्यांविरुध्द चुकीच्या फेरफारासंदर्भात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खिंडसी जलाशयाचे पाणी मोहाडी (जि.भंडारा) तालुकेतील हिवरा, वासेरा, फुटाळा, कांद्री येथे मिळण्याबाबतच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत**

**(३७) ८०४७९ (२०-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खिंडसी जलाशयाचे पाणी मोहाडी (जि.भंडारा) तालुकेतील हिवरा, वासेरा, फुटाळा, कांद्री येथे मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०८-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

तथापि, पेंच प्रकल्पाचे पाणी तालुका मोहाडी येथे सोडण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी त्यांच्या दि.१५/०४/२०१७ च्या पत्रान्वये केली आहे.

मुळ प्रकल्प अहवालाप्रमाणे पेंच प्रकल्पातील अतिरिक्त ६३ दलघमी पाणी खिंडसी पूरक कालव्याद्वारे खिंडसी जलाशयात सोडून या अतिरीक्त जलसाठ्यातून खिंडसी उच्च पातळी कालव्याद्वारे नागपूर जिल्हयाचे रामटेक तालुक्यातील १२ व भंडारा जिल्हयाचे मोहाडी तालुक्यातील ५ अशा १७ गावातील २४९३ हेक्टर क्षेत्रास सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित होते. पेंच तोतलाडोह प्रकल्पाचे वरील बाजुस मध्यप्रदेश राज्यात बांधण्यात आलेल्या चौराई धरणामुळे पेंच प्रकल्पात येणारा येवा कमी झाला आहे. त्यामुळे पेंच प्रकल्पावर अतिरिक्त सिंचन क्षेत्र निर्माण करुन ताण देणे योग्य होणार नाही. त्यामुळे प्रस्तावित एकूण २४९३ हेक्टर लाभक्षेत्रापैकी रामटेक तालुक्यातील १५६२ हे. क्षेत्र कायम ठेवून मोहाडी तालुक्यातील ५ गावांचे क्षेत्र लाभक्षेत्रातून वगळण्यात आले व त्यानुसार कालव्याच्या संरेखेस मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत**

**(३८) ८०७२४ (१२-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील पूलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश देऊनसुद्धा नांदेड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या पाच पूलांपैकी केवळ दोन पूलांचेच स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे स्ट्रक्चरल ऑडिटचे काम संथगतीने सुरु असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त स्ट्रक्चरल ऑडिटचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७)** :(१), (२) व (३) अंशत: खरे आहे
नांदेड जिल्हयातील एकुण १४ पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे आवश्यक आहे त्यापैकी ४ पुलांची संरचनात्मक तपासणी पूर्ण झाली असून उर्वरित पूलांची तपासणी प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मोठ्या शहरांना पिण्यासाठी धरणातील बेहिशेबी पाणी उपसले जात असल्याबाबत**

**(३९) ८०८५७ (२०-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मोठ्या शहरांना पिण्यासाठी धरणातील बेहिशेबी पाणी उपसले जाते त्याला पायबंद घालण्यासाठी धरणातील पाणी मीटर पध्दतीनीचे उचलण्याचे संबधित महापालिका व नगरपालिकांना शासनसक्ती करणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रकिया केंद्रे उभारणे अनिवार्य करण्यात येणार आहे अन्यथा संबधित पालिकांचे २५ टक्के पाणी कपात करण्याचे धोरण ठरविले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) इअसल्यास, ऊस,केळी, द्राक्षे, अशा बेसुमार पाणी लागणाऱ्या पिकांसाठी सुक्ष्म सिंचन करण्यात येणार असून त्यासाठी कायदा करण्याची जलसंपदा विभागाने तयारी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर धोरण व कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०८-२०१७)** :(१) हे खरे नाही.
मात्र बिगर सिंचन प्रयोजनार्थ पुरविण्यात येणारे पाणी घनमापन पध्दतीने पुरविण्याचे धोरण शासनाने सन २००३ मध्येच स्विकारले आहे.
या धोरणानुसार पाणीवापर मोजण्याकरिता पाणी मोजणी यंत्र बसविणे सर्वच अभिकरणांकरिता अनिवार्य करण्यात आले आहे. मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी वापराच्या अनुषंगाने पाणीदर पत्रकात दंडात्मक तरतूद करण्यात आली आहे.
(२) शासनाने पुणे, नाशिक व राज्यातील सर्व “ड” वर्ग महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर केंद्र उभारण्यासाठी तरतूद समाविष्ट केली आहे.

सदर तरतूदीनुसार नाशिक शहरातील ०.४ हेक्टर पेक्षा मोठ्या क्षेत्राची रेखांकने / इमारती बांधकामे, तसेच पुणे व राज्यातील सर्व "ड" वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रातील १.०० हेक्टर पेक्षा मोठ्या क्षेत्राची रेखांकने / इमारती बांधकामे यासह उक्त शहरातील समुह गृहनिर्माण योजना, शैक्षणिक, वाणिज्य, औद्योगीक, शासकिय व निम शासकिय संस्था, हॉटेल्स, लॉजिंग्स, हॉस्पिटल्स, गॅरेजेस व इतर हानिकारक/ इमारतींसाठी सांडपाणी प्रक्रिया व पुर्नवापर केंद्र उभारणे संबंधित विकासकांवर/ जमिन मालकांवर अनिवार्य करण्यात आले आहे.

मात्र, तसे न केल्यास संबंधित पालिकांचे २५ टक्के पाणी कपात करण्याचे धोरण अद्याप ठरलेले नाही.

(३) व (४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम १४(४) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणा मार्फत दि. २५ जून, २०१५ च्या अधिसूचनेद्वारे जून २०१८ पर्यंत राज्यातील १) टेंभू उपसा सिंचन योजना, २) भीमा (उजनी), ३) मुळा, ४) निम्न मानार, ५) हतनुर, ६) ऊर्ध्व पुस, ७) कान्होळी नाला (नागपूर) व ८) अंबोली (सिंधुदूर्ग) या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात बारमाही पिकांना ठिबक/ तुषार सिंचन पध्दत अनिवार्य करण्यात आले आहे.

वरील पथदर्शक प्रकल्पांच्या अनुभवाच्या आधारे ठिबक/ तुषार सिंचनचा निर्बंध राज्यातील अन्य प्रकल्पांवर जून २०१९ पासून लावण्यात येईल, अशी तरतुद सदर अधिसूचनेत करण्यात आली आहे.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/(५५०/४/१५)/सिंव्य(धोरण) दि.०२.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सुक्ष्म सिंचनाचे अंतिम उद्दीष्ट ठेवुन वितरण व्यवस्था करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अ, ब व क वर्ग नगरपालिकांमध्ये ऑनलाईन बांधकाम परवानगी देण्याचा प्रकल्प राबविण्याबाबत**

**(४०) ८०८८० (२०-०४-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अ, ब व क वर्ग नगरपालिकांमध्ये ऑनलाईन बांधकाम परवानगी देण्याचा प्रकल्प राबवण्याचा प्रयत्न आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व प्रकल्पाची अंमलबजावणी केव्हापासून अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१७) :**(१), (२) व (३) होय, केंद्र शासनाचे Ease of Doing Business अंतर्गत राज्य सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून राज्यातील नगरपरिषदा / महानगरपालिका व सबंधित नियोजन प्राधिकरणे यांच्याकडील इमारतींच्या बांधकामासाठी

लागणाऱ्या विविध परवानगी प्रकरणांत एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून शासन स्तरावर एक संगणकीय आज्ञावली (Portal) व या प्रयोजनासाठी विभागाचे संकेतस्थळ (Building Plan Management System) तयार करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयास अनुसरुन शासन स्तरावरील संगणकीय आज्ञावली व विभागाचे संकेतस्थळ विकसित करण्यासाठी सल्लागार संस्था म्हणून KPMG Advisory Services Pvt. Ltd., Mahalaxmi, Mumbai या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. Maharashtra Information Technology Corporation (MIT) संस्थेने Building Plan Management System सर्व नगरपरिषदांना उपलब्ध करुन देण्याचे ठरवून ते काम n(Code) Solution Pvt. Ltd. या संस्थेस देण्यात आलेले आहे. या संस्थेने नगरपरिषदांना बांधकाम परवानगी देण्याच्या प्रक्रियेसाठी संगणकीय प्रारुप आज्ञावली तयार केली आहे. नगरपालिका स्तरावर बांधकाम परवानगी देण्याच्या संगणकीय प्रक्रियेबाबत अंमलबजावणी करणे सुकर होण्यासाठी दि.१६/०३/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**शिरूर (जि.बीड) येथे दिवाणी न्यायालय उभारण्याबाबत**

**(४१) ८१४१३ (२१-०४-२०१७). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) शिरूर (जि.बीड) येथील न्यायालयीन इमारतीसाठी शासनाच्या ताब्यात असलेली मौजे झापेवाडी सर्व्हे क्र. ५१ मधील ४ हेक्टर जमीन राखीव वन क्षेत्र असल्याने शिरूर कासार येथील मौजे वारणी येथील गायरान जमीन गत क्र. २५९ मधून ४ हेक्टर आर जमिनीवर नवीन न्यायालय इमारत व न्यायाधीश निवासस्थान उभारणी करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन उपलब्धतेबाबतची सद्यस्थिती काय आहे तसेच सदरहू न्यायालयीन इमारतीचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे;

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) सर्व्हे नं. ५१ झापेवाडी या वन जमिनीचा जिल्हा न्यायालयास दिलेला ताबा जिल्हाधिकारी बीड यांनी दिनांक २६.१०.२०१६ रोजी रद्द केला आहे आणि मौजे वारणी येथील गायरान जमीन गट क्रमांक २५९ मधून, ४ हेक्टर जमीन शिरुर येथे न्यायालय इमारत व न्यायाधिश निवासस्थान यांचेसाठी न्यायालयाच्या ताब्यात देण्यात आली आहे. ७/१२ अभिलेखात न्यायालयाच्या नावाची मालकी हक्काची नोंद घेण्यात आली आहे. सदर ठिकाणी इमारत बांधकाम सुरु करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हा न्यायालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्धा जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकऱ्यांना कॅनलमधून पाण्याची उचल करण्याचा दिनांक बदलण्याबाबत**

**(४२) ८१४६६ (१७-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील विशेषत: वर्धा जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकऱ्यांना कॅनलमधून पाण्याची उचल करण्याचा दिनांक १५ नोव्हेंबर ऐवजी १ नोव्हेंबर करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०८-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

रब्बी हंगाम २०१५-१६ साठी पाण्याची प्रथम पाळी २० ऑक्टोबर पासुन सोडण्याबाबतचे निवेदन संबंधीत विभागास प्राप्त झाले आहे.

(२) अशा प्रकारे मागणी प्राप्त झाल्यास त्यानुसार पाणी सोडलेल्या जाते व त्याची गणना खरीप हंगामात करुन एक पाळीचा दर लावण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोळखांब (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील तलाठी शेतकरी व गोरगरीब खातेदारांना सातबारा उतारे व महसूली कागदपत्रे देण्यासाठी अडवणूक होत असल्याबाबत**

**(४३) ८२६२१ (१२-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोळखांब (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील तलाठी शेतकरी व गोरगरीब खातेदारांना सातबारा उतारे व महसूली कागदपत्रे देण्यासाठी अडवणूक करीत असल्याबाबतच्या तक्रारी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभुर्ली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील तलाठीही महिनोमहिने कार्यालयात येत नसल्याने शेतकरी व विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित तलाठ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१७) :**(१) डोळखांब, ता.शहापूर, जि.ठाणे येथील तलाठी शेतकारी व गोरगरीब खातेदारांना सातबारा उतारे व महसूली कागदपत्रे देण्यासाठी अडवणूक करीत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) डोळखांब येथील प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. अन्य प्रकरणी तत्कालीन तलाठी, सज्जा टेंभुर्ली यांचे गैरहजेरीबाबत सज्जेतील जनतेकडून प्राप्त दिनांक १०.१२.२०१५ च्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित तलाठी यांची अन्यत्र बदली करण्यात येऊन सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार तलाठी सज्जा आंबेखोर यांचेकडे दिनांक १.१.२०१६ रोजी देण्यात आलेला होता. तथापि, दरम्यानच्या कालावधीत तलाठी सज्जा आंबेखोर यांनी दिनांक १७.११.२०१६ रोजी राजीनामा दिल्यानंतर टेंभुर्ली सज्जेचा अतिरिक्त कार्यभार तलाठी सज्जा डोळखांब यांच्याकडे देण्यात आला आहे.

तलाठी सज्जा डोळखांब हे दिनांक २२.२.२०१७ रोजी कार्यालयात उपस्थित नसल्याचे तहसिलदार, शहापूर यांनी दिलेल्या अचानक भेटीदरम्यान निदर्शनास आल्याने तहसिलदार, शहापूर यांच्या अहवालानुसार उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांच्यास्तरावर श्री. बी. एन. गांजवे, तलाठी सज्जा डोळखांब यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडेगांव (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील पोलीस चौकी जवळील लक्ष्मी ज्वेलर्समधून झालेली चोरी

**(४४) ८२७३९ (२०-०४-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडेगांव (ता.बाळापूर, जि.अकोला) येथील पोलीस चौकी जवळील लक्ष्मी ज्वेलर्समधून चोरट्यांनी जवळपास ९०,००० हजाराचा ऐवज चोरल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ रोजी च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाळापूर तालुक्यात चोरीसारखे गुन्हे दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे जनतेमध्ये भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :**(१) दिनांक ०७.०२.२०१७रोजी वाडेगांव (ता. बाळापूर, जि.अकोला) येथील पोलीस चौकी जवळील लक्ष्मी ज्वेलर्समधून अज्ञात चोरटयांनी ४५,०००/- रुपयांचा ऐवज चोरलेबाबतची घटना घडली आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन बाळापूर येथे अप. क्र. ५४/१७ कलम ४५७,३८० भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

पोलीस स्टेशन बाळापूर येथे मागील ०३ वर्षात घरफोडी व चोरीचे प्रमाण खालील प्रमाणे आहे.

| शिर्षक | २०१५ | २०१६ | २०१७ (माहे एप्रिल अखेर पावेतो) |
|---|---|---|---|
| घर फोडी | ११ | ५ | १ |
| चोरी | ६५ | ४० | ८ |

सन २०१५ चे तुलनेत सन २०१६ व २०१७ अखेरीस घर फोडीचे व चोरीचे गुन्हे घडले बाबत प्रमाण कमी झाले आहेत. त्यामुळे चोरी सारखे गुन्हे दिवसेंदिवस वाढत असल्याबाबत व नागरिकांमध्ये असुरक्षीततेचे वातावरण निर्माण झाले असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) अशा प्रकारचे गुन्हयाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून या करिता आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच, प्रत्येक महिन्याला शांतता कमेटी, पोलीस मित्र, पोलीस पाटील यांची मिटींग घेवून परिसरात लोकांच्या पोलीसां प्रति भावना व अपेक्षे बाबत चर्चा करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यातील दारणा धरणाच्या ५२ गेटमधून पाण्याची गळती होत असल्याबाबत

**(४५) ८२७५८ (१७-०४-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपूरी (जि.नाशिक) तालुक्यातील येथील ब्रिटीशकालीन दारणा धरणाच्या ५२ गेटमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाहून वाया जात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्‌नूसार धरणाच्या ५२ गेटमधून वाहून वाया जाणारे पाणी अडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

सांडव्यातील ५२ गेट नसून ५० गेट (द्वारे) आहेत. पावसाळयात धरण भरल्यानंतर सदर गेट मधून मोठया प्रमाणात गळती होत असते. मात्र गळती झालेले पाणी हे दारणा नदीवर खालील बाजूस असलेल्या एम.ई.एस. बंधा-यात जमा होते व या पाण्याचा वापर पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी केला जातो त्यामुळे पाणी वाया जाते असे म्हणणे संयुक्तिक नाही.

(२) होय

(३) पाणी गळती रोखण्यासाठी आवश्यक ती दुरुस्तीची कार्यवाही एका गेटवर केली असता ती यशस्वी झाली आहे. त्यानुसार उर्वरित सर्व द्वारांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही यांत्रिकी विभागामार्फत क्षेत्रिय स्तरावर चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अचलपुर तालुक्यातील (जि.अमरावती) फिनले मिलमध्ये काम करणा-या कामगारांचा चुकीच्या पद्धतीने भविष्य निर्वाह कापला जात असल्याबाबत**

**(४६) ८३०९३ (२०-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपुर तालुक्यातील (जि.अमरावती) फिनले मिलमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा चुकीच्या पद्धतीने भविष्य निर्वाह कापला जात असल्याने कामगारांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मिलमध्ये ६५० कामगार कार्यरत असून उक्त प्रकरणी कामगार आयुक्तांकडे लेखी तक्रारही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू कामगारांना योग्य पद्धतीने भविष्यनिर्वाह निधी देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०७-२०१७) :**(१) होय, लेखी तक्रार करण्यात आली आहे.

(२) होय, लेखी तक्रार करण्यात आली आहे. माहे एप्रिल, २०१७ मध्ये ६४३ कामगारांचे भविष्य निर्वाह निधी अंशदान जमा करण्यात आले आहे.

(३) या प्रकरणी चौकशी करण्यासाठी भविष्य निर्वाह निधी संगठन कार्यालयातील प्रवर्तन अधिकारी यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमण्यात आले होते. तसेच संबंधित संस्थेस दि.१४/०२/२०१७ व दि.१८/०५/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

कार्यालयीन दस्ताऐवजानुसार दि.०१/०४/२००९ ते दि.३१/१२/२०१६ या कालावधीमध्ये भविष्य निधी सदस्यता पासून वंचित कर्मचाऱ्यांना कर्मचारी नांमांकन योजना २०१७ अंतर्गत १३२ कर्मचाऱ्यांना घोषीत करून अनुपालन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाली खानू (जि.रत्नागिरी) येथील मुंबई-गोवा महामार्गावर गावाजवळ झालेल्या अपघाताबाबत**

**(४७) ८३१२८ (२०-०४-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली खानू (जि.रत्नागिरी) येथील मुंबई-गोवा महामार्गावर झायलो कारच्या चालकाचे कारवरील नियंत्रण सुटून झालेल्या अपघातात विलेपार्ले येथील सात जणांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अपघाताची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे,
(२) होय.

सदर अपघाताची चौकशी चालू असून, सदर अपघातावरुन वाहन चालक प्रशांत जगन्नाथ गुरव, याने त्याचे ताब्यातील झायलो गाडी मध्ये ७ इसम बसवून त्यांना गोवा येथे फिरविण्याकरीता घेवून जात असतांना सदरची गाडी खानू गावी आलेवेळी अपघातातील वाहन चालक याने भरधाव वेगाने वाहन चालवित असताना त्याचा वाहनावरील ताबा सुटल्याने सदरचे वाहन झाडावर ठोकर देवून अपघात केला असून, यामध्ये वाहन चालकाची कसुरी दिसून येते. सदर प्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १७/२०१७. भा.दं.वि.स. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या अपघातामध्ये वाहनचालकासह एकूण ७ व्यक्ति मयत झाल्या आहेत.

सदर भागात अपघात होवू नये म्हणून रिफलेक्टर लावण्यात आलेले आहेत. तसेच मार्गदर्शक पर फलक लावण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खासापूरी मध्यम प्रकल्प (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील डाव्या व उजव्या कालव्याची झालेली दुरवस्था

**(४८) ८३४६९ (१८-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खासापुरी मध्यम (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) प्रकल्पावरील डाव्या व उजव्या कालव्याची प्रचंड प्रमाणावर दुरवस्था झालेली असल्याने प्रकल्पामधून शेतीसाठी सदरील कालव्याद्वारे पाणी सोडल्यानंतर नादुरुस्त कालव्यामधून लाखो लिटर पाणी नदीपात्रात वाहून जात असल्याचे माहे नोव्हेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरील नादुरुस्त कालव्यामुळे मागील ४ वर्षापासून एकदाच पूर्ण क्षमतेने भरलेल्या प्रकल्पातील ५० टक्के पाणीसाठा कमी झाला असून सदरील कालव्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार कालव्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे. रब्बी हंगामात कालव्याव्दारे पाणी सोडण्यापूर्वी यांत्रिकी विभागाच्या मशीनव्दारे कालव्यातील गाळ,झाडे झुडपे काढूनच शेतकऱ्यांच्या मागणीनुसार कालव्यामध्ये पाणी सोडलेले आहे.खासापूर मध्यम प्रकल्पावर प्रवाही सिंचन राबवितेवेळी कालव्यावरील बांधकामे व इस्केप मधून ०.१ द.ल.घ.मी. पाणी गळती झाली.

(२) हे खरे असून स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री जलसंपदा यांच्याकडे दिनांक २०.२.२०१७ रोजी निवेदनाद्वारे अशा प्रकारची मागणी केली आहे.
(३) दि.१७.११.२०१६ च्या शासन निर्णयाअन्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतूदीनुसार सिंचन प्रकल्पाचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करण्यात आले आहे.तसेच पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही चालु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिवकालीन, ब्रिटीशकालीन पुलांची तपासणी करण्याबाबत**

**(४९) ८३६०३ (१२-०४-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिवकालीन, ब्रिटीशकालीन पुलांची शासनाने तपासणी केली असून सदर तपासणीमध्ये २१०० पूल धोकादायक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावरील सावित्री नदीवर असलेला जुना पूल कोसळल्यानंतर जिल्हा प्रशासनाकडून ब्रिटीशकालीन जीर्ण पूलांबाबत आढावा बैठक घेऊन उपाययोजना आखण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आढावा बैठकीत कोणत्या बाबींवर निर्णय घेण्यात आला व त्यानुषंगाने राज्यातील धोकादायक पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०७-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही.
सा. बां. विभागाच्या रस्त्यांवरील सर्व पूलांची तपासणी केली असून पूलांची दुरूस्ती करणेची कामे टप्याटप्यात मंजुरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेष मागास प्रवर्गाच्या राखीव जागांमध्ये वाढ करण्याच्या मागणीबाबत**

**(५०) ८३९५६ (२१-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विशेष मागास प्रवर्गासाठी २ टक्के राखीव जागा ठेवल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रवर्गातील अनेक जातींचा विचार करता त्यामध्ये वाढ करून ४ टक्के कराव्यात, अशी मागणी कोकणस्थ अखिल खारवी ज्ञाती सहाय्यक संघ, मुंबई या संस्थेमार्फत सन २००५ पासून सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या या जातींच्या उन्नतीसाठी त्यांच्या राखीव जागात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१७) :**(१) होय.

(२) अशा प्रकारची निवदने या कार्यासनात प्राप्त झालेली नाहीत.

(३) व (४) बाबत इंद्रा सहानी व इतर विरुध्द केंद्र शासन तसेच एम. नागराज याप्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार घटनेच्या कलम १६(४) मध्ये राखीव जागेबाबत जे प्रमाण दिले आहे ते ५० टक्केच्या वर जाता कामा नये. सद्यस्थितीत आरक्षण कायदयातील कलम ४ (२) नुसार मागास प्रवर्गांसाठी सरळसेवेत खालील प्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे. अ.जा. १३% अ.ज. ७% वि.जा.अ.३% भ.ज.ब. २.५% भ.ज.क. ३.५% भ.ज.ड. २% वि.मा. प्र. २% इ.मा.व. १९% असे एकूण आरक्षण ५२% विहीत केले आहे, तथापि सदर अधिनियमाविरुध्द देखील मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान दिलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे विमाप्र प्रवर्गाच्या राखीव जागात वाढ करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.